| QUE. NO. | Sub. Q.No. | अ | आ | इ | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MARKS | 5½ | 6 | ५ | | = | 15½ | 16 |

3

प्रश्न क्र. Q.No. 1

विभाग 1 : गद्य

प्र.1 (अ)

(1) उपोषणाची बातमी चाळीत जाहीर झाल्यावर कानांवर येणारी वाक्ये -

(i) 'नाही ती भानगड' आहे.

(ii) उगीच 'दात दाखवून अवलक्षण' आहे.

2

(2)

(i) कार्डवर दाखवलेले वजन : - मकशे मक्कयाऐंशी पौंड

(ii)

लेखकाची आस्था वाढू लागलेले शब्द

- प्रोटीनयुक्त पदार्थ
- चरबीयुक्त द्रव्ये

2

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 1

(3) 'उपास' या पाठात लेखक 'पु. ल. देशपांडे' आपले वाढलेले वजन कमी करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आपल्याला सांगतात. लेखक वजन कमी करण्यासाठी आहारशास्त्रावरच्या पुस्कात डोके घालू लागले. ते प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीमुक्त द्रव्ये वगैरे खायला लागले. त्यांना ताटातले पदार्थ ताटातल्या पदार्थांत 'कॅलरीज' दिसत होत्या. वजन कमी करण्यासाठी त्यांनी बिनसाखरेचा चहा प्यायला सुरुवात केली. वजन कमी झाले पाहिजे, या विचाराने त्यांची झोप उडाली; पण झोप कमी झाली तर वजन उतरते असे वाटल्यामुळे त्यांना या गोष्टीचा फरक पडला नाही. अशा प्रकारे आपले वजन कमी करण्यासाठी लेखकाने खूप प्रयत्न केले.

1½

(आ)

(1) रेखामावशींची कामे

↓ फरशी पुसणे

↓ भांडी धुणे

2

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS → | | | | | | | |

5

प्रश्न क्र. Q.No. 1

(2)

(i) दार उघडणारा – अभिषेक

(ii) फरशी पुसणाऱ्या – रेखामावशी

(iii) अभिषेकचा आतेभाऊ – सुमित

(iv) स्वच्छतेची भोक्ती – स्नेहल

2

(3)

आता वाढत्या प्रदूषणामुळे, वृक्षतोड केल्यामुळे जागतिक तापमानवाढसारखे भीषण संकट आपल्यावर आले आहे. म्हणून प्रदूषण कमी करण्यासाठी, आपल्या या सुंदर पृथ्वीला वाचवण्यासाठी सर्वांनी आठवड्यातून एकदातरी सायकलचाच वापर केला पाहिजे. सायकल वापरल्यामुळे आपण पृथ्वीवरील प्रदूषण कमी करतो. थोडं का होईना; पण आपण आपल्यापरीने प्रदूषण कमी करायला हवे. आपला खारीचा का होईना, वाटा उचलायला हवा. तर चला,

सायकल चालवण्याचा करूया संकल्प,
पृथ्वी वाचवण्याचा, प्रदूषण कमी करण्याचा
हाच एक विकल्प.

2

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS → | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 1

## अपठित गद्य

(३)

(1)

शिक्षणामुळे मानवाच्या विकसित होणाऱ्या शक्ती

- मानसिक शक्ती
- बौद्धिक शक्ती

(2)

स्त्री शिक्षणाचे चांगले परिणाम -
आजकल जगातील पुष्कळशा भागांत आपणांस स्त्री शिक्षणाचे चांगले परिणाम दिसून येतात. परिणामत: पुष्कळ वाईट रीतिभाती आणि अंधश्रद्धा समाजातून वेगाने नाहीशा होत आहेत. राष्ट्रीय विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत आणि त्यांच्या बरोबरीनेच जबाबदारीच्या कामात त्यांना मदत करीत आहेत.

| QUE. NO. | Sub. Q.No. | अ | आ | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | MARKS | 7 | 7 | | | | = | 14 |

प्रश्न क्र. Q.No. 2

विभाग 2 : पद्य

प्र.2 (1)

(i) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट - कवीचे हात

2 (ii) कवीचा जवळचा मित्र - कवीचे अश्रू

(2)

(i) कवीचा प्रयत्नवाद व आशावाद दाखवणारी ओळ —

1 'दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो'

(ii) 'दारिद्र्याकडे गहाण पडलेले हात' -
अर्थ : कवीच्या हातांमध्ये नवनिर्मितीक्षम, सृजनशीलता, काव्य-प्रतिभा असूनसुद्धा गरिबीमुळे, दारिद्र्यामुळे त्यांच्या या कलेची कोंडी केली गेली. त्यांना काम मिळवून देणारे हे हात खस्ता खाण्यात, मेहनत करण्यात ~~व्यस्त होते व्य~~ व्यस्त होते. म्हणून त्यांच्या या प्रतिभा असलेल्या सृजनशील हातांना दारिद्र्यामुळे कधीही ~~नव~~निर्मिती करता आली नाही. 1 2

(3) P.T.O

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 2

(3)

| | शब्द | अर्थ |
|---|---|---|
| 1. | दारिद्र्य | गरिबी |
| 2. | हरघडी | प्रत्येक वेळी |
| 3. | साहाय्य | मदत |
| 4. | दुनिया | जग, संसार |

2

(4) 'दोन दिवस' या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी कामगारांच्या जीवनाचे वास्तव चित्र आणि त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोण रेखाटले आहे.

कष्टकऱ्यांच्या जीवनाचे एक वेगळेच भावविश्व आपल्याला या कवितेतून कळते. कष्टकरी कामगारांना वीत टीचभर पोटाची भूक भागवण्यासाठी खूप कष्ट आणि मेहनत करावी लागते. खस्ता खाण्यात, मेहनत करण्यात त्यांची पूर्ण जिंदगी निघून जाते. निसर्गाचे सौंदर्याचा आस्वाद त्यांना कधीही घेता येत नाही; मात्र तरीही हे कष्टकरी आपला जीवनावरील प्रेम सोडत नाही. सुखाची वाट पाहण्यात त्यांचे पूर्ण आयुष्य निघून जाते; पण ते कधीही आपल्या संकटांना, अडी-अडचणींना वाकत करत नाही. तसेच आपल्याला ही आपल्या जीवनात येणाऱ्या

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | | | | | | |

9

| प्रश्न क्र. Q.No. | 2 | संकटांना हि संकटांशी हिंमतीने संघर्ष करायला पाहिजे. |
|---|---|---|

11

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | MARKS → | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 2

(आ) 'अंकिला मी दास तुझा'

1 (1) प्रस्तुत कवितेचे कवी - संत नामदेव

1 (2) प्रस्तुत कवितेचा विषय - परमेश्वर भेटीची तीव्र इच्छा व्यक्त करणे, हा या कवितेचा विषय आहे

1½ (3) प्रस्तुत कविता आवडण्याची व न आवडण्याचे कारण - 'अंकिला मी दास तुझा' या अभंगात 'संत नामदेवांनी' आपली परमेश्वर भेटीची इच्छा अत्यंत साध्या-सोप्या भाषेत आपल्याला सांगितली आहे. अत्यंत मोजक्या शब्दांत त्यांनी आपली इच्छा व्यक्त केली आहे. या कवितेत 'बिंदूमध्ये सिंधू' म्हणजे कमी शब्दांत खूप काही सांगण्याची क्षमता आहे. छोटे - छोटे उदाहरणांमुळे ही कविता लवकर व सहजपणे आकलन करता येते. तसेच ही कविता श्रवणीय असल्यामुळे मला फार आवडते.

(4) दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ -

'वणवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी ॥

सरळ अर्थ -

1½ जेव्हा वनात वणवा लागतो, तेव्हा हरिणी आपल्या पाडसाच्या चिंतेने व्याकुळ होते. वणवा पेटताच तिला आपले पिल्लू कुठे असेल आणि सुरक्षित असणार की नाही

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | | | | | | |

11

प्रश्न क्र. Q.No. 2

~~याची चिन्ता होते.~~ तिला होते चिंता होते.

(5) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ -

(i) माता - आई, जननी
(ii) कनवाळू - दयाळू
(iii) काज - काम
(iv) धेनू - गाय

2

12

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS → | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 3

विभाग ३ : स्थूलवाचन

(i) डॉ. होमी भाभा -

डॉ. होमी भाभा हे प्रख्यात अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला. ~~त्या~~ त्यांच्या या कामाचे गौरव व्हावे म्हणून 'बार्क' म्हणजेच 'भाभा ॲटोमिक रिसर्च ~~सेंटर म्हणजे~~' भाभा अणुसंशोधन केंद्राला' त्यांचे नाव देण्यात आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी आणि स्फूर्तिदायक होते. ~~&~~ लेखक डॉ. अनिल काकोडकर यांना बॉर्कच्या ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षण घेत असताना डॉ. होमी भाभा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. 'आपण काय काम करायचं आहे ते आपणचं ठरवलं पाहिजे आणि आपलं काम आपणचं निर्माण केलं पाहिजे.' असे मोलाचे मार्गदर्शन त्यांना डॉ. होमी भाभा यांच्याबरोबरच्या चर्चेतून मिळाले. ~~त्या~~ लेखकांनी या सूचनेचा तंतोतंत पालन केले आणि आपल्या यशाचा मार्ग आखला.

(iii)

ठणठणीत कोरडेपणा, पाण्याची कमतरता, ओलावा नसलेली ओसाड जमीन ही वाळवंटी प्रदेशाची प्राकृतिक वैशिष्ट्ये आहे. म्हणून येथे वनस्पतींचे प्रमाण खूपचं कमी असते. या वनस्पतींचा जणू कॅक्टस हा प्रतिनिधी आहे असे वाटते. वाळवंटी प्रदेशात टिकून राहण्यासाठी निसर्गाने या वनस्पतींना अनोखी वैशिष्ट्ये बहाल केली आहेत. कॅक्टसची अंगरचना जास्तीत जास्त पाणी साठून ठेवण्या योग्य आहे. जेव्हा

| QUE. NO. | Sub. Q.No. | i | ii | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | MARKS | 2½ | 3 | | | | = | 5½ - 06 |

13

प्रश्न क्र. Q.No. 3

पाऊस पडतो तेव्हा कॅक्टस जास्तीत जास्त पाणी शोषून घेतो. त्यांच्या मुळांची रचना देखील कमी वेळेत जास्त पाणी शोषून घेऊ शकते अशी आहे. लांबवर मुळे पसरून कॅक्टस सभोवतालच्या भागातील पाणी शोषून घेतो. कोरड्या, उष्ण हवेसमोर ~~कॅक्टसच्या~~ शरीराचा खूप कमी भाग येतो. बाष्पीभवनापासून वाचण्यासाठी हे झाड निष्पर्ण असते. बहुतेक कॅक्टसची अंगरचना घडीदार ~~असत~~ असल्यामुळे घड्यांचा वापर पन्हाळीसारखा करून पाणी (पावसाचे पाणी) थेट मुळापर्यंत पोहचते. म्हणून 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे ~~याचा~~ नमुना म्हणजे कॅक्टस!' असे म्हटले जाते.

3

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 4

विभाग 4 : भाषाभ्यास

(अ)

(1)

(i) शाब्बास! चांगले काम केलेस तू! - उद्गारार्थी वाक्य

2 (ii) मुलांनो रांगेत चाला. - आज्ञार्थी वाक्य

(2)

(i) ही कल्पना वाईट नाही.

2 (ii) जगात सर्वतसुखी असा कोणचं नाही, आहे.

(3)

(i) रममाण होणे -
अर्थ : मग्न होणे
2 वाक्य : नेहा गाणी ऐकण्यात रममाण झाली होती.

(ii) झोकून देणे -
अर्थ : पूर्णपणे सहभागी होणे
2 वाक्य : आई बाळाला शिकवताना स्वतःला झोकून देते.

(iii) अंगाचा तिळपापड होणे -
2 अर्थ : अतिशय (खूप) राग येणे, संताप होणे

| QUE. NO. | Sub. Q.No. → | इ | आ |  |  |  |  | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | MARKS → | 8 | 8 |  |  |  |  | = 16 |

15

प्रश्न क्र. Q.No. 4

वाक्य : आपल्या मुलाने चोरी केली आहे, हे ऐकून आईच्या अंगाचा तिळपापड झाला.

(आ) शब्दसंपत्ती

(1)

(i)
(I) झाड - वृक्ष, विटप, पादप

(II) घर - सदन

(ii)

(I) प्रामाणिक × अप्रामाणिक

(II) सावध × बेसावध

(iii)
समाजसेवा करणारा - समाजसेवक

(iv)
(I) रस्ता - रस्ते

(II) भिंत - भिंती

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 4

(2)

(i) गाव्हाणी

2 (ii) प्रक्रिया

(3)

| चिन्ह | नाव |
|---|---|
| ? | प्रश्नचिन्ह |
| ; | अर्धविराम |
| ! | उद्‌गार चिन्ह |
| ' ' | एकेरी अवतरण चिन्ह |

2

| QUE. NO. | Sub. Q.No. | अ | आ | इ | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | MARKS | 4½ | 9 | 6½ | | | | 20 |

17

प्रश्न क्र. Q.No. 5

विभाग 5 : उपयोजित लेखन

(अ)

(1) पत्रलेखन (औपचारिक पत्र)

दिनांक : ४ मार्च, २०२४
प्रति,
माननीय व्यवस्थापक,
हिरवाई ट्रस्ट,
बालोद्यान मार्ग,
तळेगाव दाभाडे.

विषय : वृक्षरोपण करण्यासाठी रोपांची मागणी करण्याबाबत.

महोदय,
मी, गायत्री पिंगळे, ज्ञानसंपदा विद्यालयाची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांचे संमतीने हे पत्र लिहीत आहे. आपण जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रोपांचे मोफत वाटप करत आहात हे कळाले.
जागतिक ~~दिन~~ पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आमच्या शाळेत वृक्षारोपण करण्यात येणार आहे. त्यासाठी आम्हांला काही रोपांची आवश्यकता आहे.
रोपांची यादी पुढीलप्रमाणे -

P.T.O

18

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS | | १ | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 5

| रोपाचे नाव | नग |
|---|---|
| तुळस | १० |
| गुलाब | १० |
| मोगरा | २० |
| चाफा | १५ |

ही रोपे आम्हांला जागतिक पर्यावरण दिन या दिवशी वृक्षरोपण करण्यासाठी लागणार आहे; म्हणून तुम्ही आपण ही रोपे लवकरात लवकर पाठवावी अशी विनंती.

कळावे,

आपली विश्वासू
गायत्री पिंगळे
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानसंपदा विद्यालय,
तळेगाव दाभाडे.
gyansampada@gmail.com

4½

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS → | | | | | | | |

19

प्रश्न क्र. Q.No. 5

(आ)

(1) जाहिरात लेखन

(1) जंगल भ्रमंतीसाठी नोंदणी शुल्क - रु. 200/-

(2) उद्यानात भ्रमंती करण्यासाठी वयोगट - 10 ते 15 वर्ष

(3) उद्यानात फिरण्याची कालावधी - 25 डिसेंबर ते 27 डिसेंबर

(4) जंगल भ्रमंतीचे ठिकाण - राष्ट्रीय उद्यान

(5) आयोजक संस्थेचे नाव - जंगल भ्रमंती संस्था, तापोळा

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | MARKS → | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 5

(आ) (3) कथालेखन

## आळस माणसाचा शत्रू!

सोनापूर नावाच्या एका गावात 'कृष्णदेव' नावाचा एक राजा राहत असतो. तो त्याच्या प्रजेला मदत करण्यासाठी नेहमीच तत्पर होतो; मात्र त्याची प्रजा आळशी असते. त्यांना काम करण्याचा खूप कंटाळा येतो. हे पाहून राजा कृष्णदेव घाबरतो. जर माझी प्रजा अशीच आळशी राहिली तर माझ्या हे गाव कधीही प्रगती नाही करेल, या विचाराने तो चिंतित होतो.

प्रजा उद्योगी व्हावी म्हणून एक दिवस तो युक्ती करतो. त्यांना उद्योगी बनवण्यासाठी तो रस्त्यात मधोमध दगड ठेवतो; मात्र तो फक्त दगड ठेवत नाही त्या दगडाखाली तो सोन्याची नाणी असलेली एक पिशवी पण ठेवतो. अनेक लोक त्या रस्त्यावरून जातात, पण कोणीही तो दगड उचलत नाही. सर्व आळशी असल्यामुळे कोणीही ते दगड उचलत नाही. एक दिवस एक गरीब माणूस त्या रस्त्यावरून भिक्षा मागत हळूहळू चालत जात होता. दगड पाहून कधी कोण ह्या दगडाला दुर्लक्ष करून पडू शकते म्हणून तो खूप मेहनतीने ते दगड उचलून बाजूला ठेवतो. दगड बाजूला ठेवल्यानंतर त्याला ती सोन्याची नाणी असलेली पिशवी दिसते.

तो प्रामाणिक असल्यामुळे ती पिशवी तो राजदरबारात जाऊन राजाला देतो. तेव्हा राजा म्हणतो, "तू लोकांना

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Examiner Marks | | | | | | | |
| | Moderator Marks | | | | | | | |

| प्रश्न क्र. Q.No. | |
|---|---|
| 5 | त्रास होऊ नये म्हणून तो मोठा दगड बाजूला केलास. तुझा या पिशवीवर हक्क आहे. ही पिशवी आतापासून तुझी." हे ऐकून तो गरीब माणूस खूप खुश होतो. सर्व लोकांना हे कळते, की आळस माणसाचा शत्रू असतो. ह्या नंतर सर्व लोक उद्योगी बनतात आणि खूप मेहनत करतात. |
| 4 | तात्पर्य : कधीही आळशी बनू नये कारण आळस हा माणसाचा शत्रू आहे. |

| QUE. NO. | Sub. Q.No. | | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Examiner Marks | | | | | | | | |
| | Moderator Marks | | | | | | | | |

3

प्रश्न क्र. Q.No. 5.

(इ) निबंधलेखन :

(2) आत्मकथन

मी क्रीडांगण बोलतोय

नमस्कार मित्रांनो ! अरे इथे खाली बघा. मी क्रीडांगण बोलत आहे. घाबरू नका. मी आज तुम्हाला एक जुनाची गोष्ट सांगणार आहे. काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. रोज शाळा संपली की अनेक मुलं येथे अनेक खेळ खेळायची. क्रिकेट, फुटबॉल, बॅटमिंटन इत्यादी खेळ ते येथे खेळायची. त्यांना पाहून मला खूप आनंद व्हायचा; पण आता मी असाच एकटा पडलो असतो. कोणीही मैदानी खेळ खेळण्यासाठी येत नाही.

तुम्हाला माहित आहे का, मैदानी खेळ खेळल्यामुळे रक्तप्रवाह चांगलं होतं. तुम्ही स्वस्थ राहता. तुम्हाला कसलाही आजार होत नाही. तुमचे रोज व्यायाम देखील होते. असं म्हटलं जातं —

व्यायाम आरोग्यदायी मित्र,
हे ध्यानी ठेवावे सूत्र।

पण आत सगळी मुलं स्वतःला घरात बंदिस्त बसून; मैदानी खेळ खेळतच नाही. आजकाल संगणक आणी टेक्नोलॉजी आल्यामुळे माझं महत्त्व कमी झालं आहे. या संगणकाच्या-युगात सगळे जण मोबाईल, टीव्ही अशा इत्यादी

4

| QUE. NO. | Sub. Q.No. → | | | | | | | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Examiner Marks → | | | | | | | |
| | Moderator Marks → | | | | | | | |

प्रश्न क्र. Q.No. 5

वस्तूंच्या प्रभावात आले आहेत. कित्येक दिवस झाले मी खोडकर, खेळकर मुलांना पाहिलं नाही आहे.

टीव्हीचा प्रभाव वाढल्यामुळे आत्ता सर्व मुलं टीव्ही पाहत असतात नाहीतर मोबाईलवर आपला वेळ घालवतात. यामुळे मी एकटा पडलो आहे. ~~अतिक्रमणामुळे~~ आत्ता या वस्तूंच्या अतिक्रमणामुळे मुलांना चश्मा लागला आहे. आतापासूनच त्यांना अनेक आजार व्हायला लागले आहे. पाठदुखी, अंगदुखी, वाढलेले वजन, अशी लक्षणे आता सर्वां मुलांमध्ये दिसत आहे.

माझी तुम्हा सर्वांना ही नम्र विनंती आहे, की तुम्ही बाहेर येऊन खेळ खेळा. तुम्ही सर्व विज्ञानात प्रगती करा, यशाची शिखरे गाठा; पण त्याच्याबरोबर स्वतःला स्वस्थ पण ठेवा. नाहीतर जर खूप पैसे कमवून सुद्धा तुम्ही आजारी असाल तर तुम्ही या जीवनाचा आस्वाद नाही घेऊ शकणार. आशा करतो, की तुम्ही नक्कीच थोडा वेळ माझ्यावर येऊन खेळाल. तर लवकरच भेटू...

6½